


# संदर्भ

आनंद मोरे

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. २५१८
REFBK-0024444
REFBK-0024444

म. रा. ग्रं. संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ वाङ्मय
२५९८
२४४४४
२७१२५८४

# संदर्भ….

आनंद मोरे

REFBK-0024444
REFBK-0024444

अभिनव प्रकाशन, मुंबई १४

किंमत पाच रुपये

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाच्या
अनुदानाने प्रकाशित.

प्रकाशक :

**वामन विष्णु भट**
अभिनव प्रकाशन, ५३ गुरु नानक मार्केट,
डॉ. आंबेडकर रोड, दादर,
मुंबई ४०० ०१४.

प्रसिद्धी : ऑगस्ट १९८४

मुखपृष्ठ : श्री. **विश्वनाथ घैसास**

सर्व हक्क :

श्री. **आनंद मोरे** यांचे स्वाधीन.

मुद्रक :

**य. गो. म्हात्रे**
नरेश मुद्रणालय
अलिबाग–रायगड.

सृष्टीतल्या सर्व कष्टकऱ्यांना...

**–आनंद मोरे**

# प्रसिद्धी—

- .कै अण्णाभाऊ साठे काव्य-लेखन स्पर्धा, औरंगाबाद.
  (महाविद्यालयीन, महाराष्ट्र राज्य स्तरावरील)
  प्रथम पारितोषिक.

- कै. ग. दि. माडगूळकर काव्य-लेखन स्पर्धा, कोल्हापूर.
  (महाविद्यालयीन, महाराष्ट्र राज्य स्तरावरील)
  सन्मानपत्र.

- सर्व कविता आकाशवाणी पुणे आणि मुम्बई केंद्रावरून प्रसारित.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५१९८
दा. क्र. २०४६७
काव्य २४०१९५ मो
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

# प्रस्तावना

श्री. **आनंद मोरे** हे एक कोरं नाव आहे. ह्या दृष्टीने की कविता वाचणाऱ्या रसिकाला ते फारसे परिचित नाहीत. औरंगाबाद व कोल्हापूर शहरातील काही व्यापक पातळीवर काव्य लेखन स्पर्धात त्यांनी प्रथम पुरस्कार प्राप्त केले आहेत. मुंबई–पुणे केंद्राच्या आकाशवाणीवरही त्यांचे कविता वाचनाचे कार्यक्रम झाले आहेत. पण तरीही ह्या कवीच्या वृत्तीचा व अभिव्यक्तीचा ढंग पूर्णत: अनोखा आहे. म्हणूनच त्यांचे चरा न पडलेल्या मनाने स्वागत करायला हवे.

गर्दीत वावरणाऱ्या माणसांच्या एकाकी सोशीकपणाचे शब्दांकन हे मोरे यांच्या 'संदर्भ' या संग्रहाचे खास वेगळेपण म्हणून दाखविता येईल. सर्वच नगरा–महानगरात माणूस एकटा असतो. 'ग्रीष्माच्या झळा' आणि 'उन्हापावसाचे लपंडाव' साहूनही त्याचे ताठ–ताठरपण अविचलच राहते. जीव जडवण्याचा, प्रेम करण्याचा डाव तो मांडतो. त्यातल्या अटळपणाचा नि अपेशाचा तो स्वीकार करतो. अश्रूंची किंमत मोजूनही विशेष काही न घडण्याचा शाप, हेच ह्या माणसांचे भागधेय असते. त्यांचे मानसिक स्थलांतर घडतच नाही. माणसांच्या वाट्याला येणाऱ्या ह्या फलिताकडे पाहिले तर सोसणे हाच निसर्गक्रम वाटतो. त्यातूनच मोरे प्रतीक उचलतात झाडाचे. कारण ते स्थलांतर करीत नाही. ह्या झाडावर चांदण्याचा शीतल प्रकाश पाझरतो. तसेच तारकागर्भातील ऊष्णताही झेपावते. ऋतुचक्रात हे झाड बहरते, मोहरते, बावते. तद्वतच ते आपले भवितव्याचे दानही विनातक्रार साहते. श्री. आनंद मोरे यांच्या पंचेचाळीस कवितांमध्ये हा सृष्टीमन:–संवाद सातत्याने जाणवतो. काहीच न नमूद करताही ही वृत्ती गोविंदाग्रजांच्या 'प्रेम आणि मरण' कवितेतल्या कथेशी सांधा जोडते. तर 'प्रेम आणि जीवन'कार कवी

अनिलांचे सूरही आजच्या संदर्भात रेखित करते. ह्या भिन्न संस्कारपटलात मराठी कवितेच्या अर्धशतकाचा वारा कवी आनंद मोरे ह्यांनी, हृदय भरून पचविला आहे याचा प्रत्यय येतो. ' एकाकीपणा ' या कवितेत ते म्हणतात–

तो वृक्ष...
अजूनही तसाचताठ उभा...
...............
अर्थ निरर्थ यांचे संदर्भ सांधताना
प्रकर्षानं जाणवतंय एकाकीपण

हीच भाववृत्ती ' क्षण ' कवितेत प्रकट होते ती अशी–

किरण पांघरून
उद्विग्न मन
असाही क्षण
सारेच उदासीन...

' किनारे ' कवितेतही–

काळाची गती अजमावताना
होतोय मनाचा कोंडमारा
...............
गवसतो सहारा तरीही
फसवे सारे किनारे.

श्री. मोरे यांच्या कविता साध्या आहेत. म्हणूनच त्या सरळपणे वाचणाराला स्पर्श करतात. मराठी कवितेच्या अनेकधारी प्रवाहांमध्ये एक समज असा रूढ झाला होता की, कवितेची एक नटवी भाषा असते. ती सरळपणाशी दूरान्वय ठेवते. काहीशी कृत्रिम असते. तर बव्हंशी आत्मनिमग्न होते. पण खळाळत्या पाण्याने ठरीव ठाशीव खुणा पुसून टाकाव्यात, तसे ह्यादेखील संकेताबाबत घडले आहे. नितळ सहजता हा या कवीच्या सरळ कवितांचा अंगभूत गुण आहे.

' भावना ', ' ती उभी ', ' प्रतीक्षा ', ' अशा अवेळी ', ' अर्थ ', ' एक मुसाफिर ' ह्या प्रेमकवितात श्री. मोरे यांच्या तारुण्यसुलभ भावनांचा आविष्कार आढळतो. ' ती उभी ' ही कविता तर एक तरल प्रतिमाच नजरेसमोर साकार करते. ती पारंपरिक व परिचित असूनही मनोज्ञ उतरली आहे.

विरून जातंय चंद्राचं प्रतिबिंब
खळखळणाऱ्या पाण्यात
फुलांचा गंध श्वासात घेऊन
ती उभी केव्हाची अंगणात...

ह्या ओळीतून श्री. मोरे यांच्या आविष्कारभावनेचा अनुभव येतो.

एकीकडे मनाच्या विषण्ण पराभूत वृत्तीची काळी कडा तर दुसरीकडे निसर्गसन्निध असणाऱ्या ग्रामजीवनातील बोलकी प्रतिके यांची सांधेजोड करून श्री. आनंद मोरे आपल्या कवितेला गतिमान करताना दिसतात. त्यामुळेच बेळूबन, सळसळणारे पाणी, दिवेलागण, रातकिडयांची किरकिर, काजव्याचा प्रकाश-आधार, गाभारा, फकीर, ओंजळीतली नक्षत्रे, चंदनशय्या, अशा निश्चित अर्थवाही प्रतीकांना कवी जाणीवपूर्वक आकार देताना दिसतो.

वरील दोन दिशांचा विरोधही त्यांच्या कवितेला कारणीभूत ठरला आहे. ' सद्भावना ' या कवितेत—

या गजबजलेल्या शहरातील चांदण्या
मृतवत् देहांना वासनेनं सजवतात
कुबटलेल्या त्यांच्या खिडक्यांच्या झरोक्यातून
लाल दिव्यांचे प्रकाश झोत...
क्षणभर बाहेर येतात आणि...
क्षणात विझतात, का विझतात ?

' लाल दिव्यांचे प्रकाश झोत ' हे रेडलाईट एरियाचे ईषद्दर्शन बटबटीत नसल्यामुळेच प्रभावी झाले आहे. ' स्वतःच्याच शरीराचा लिलाव मांडून ' रोजची भूक भागविणारी, ' ती ', ' ती ही जगतेय ' या कवितेत त्यांनी रंगविली आहे. ' ती ही जगतेय ' या शीर्षकातील ' ही ' हा शब्द सार्वनामिक विशेषणाची शक्ती व क्षमता देईल अशा पद्धतीने कवीने मार्मिकपणे उपयोजिला आहे. ' तिची कर्मकहाणी ' ह्या कवितेत देखील ह्याच बकालपणाचे प्रतिबिंब पडले आहे. ' देहान्त ' ही कविताही त्याच वळणाची आहे.

अशा संमिश्र कवितांचे एक सामर्थ्य श्री. मोरे अभिव्यक्त करतात. प्रेमकाव्याची किंवा प्रेमभावांची अलवारता आणि बकाल वास्तवातील

त्याचे चूर चूर होणे ह्या दोन घटकांनी 'बरं केलंस', 'दिशाहीन', 'सद्भावना', 'नागवे' इत्यादी कविता ह्या लक्षणीय बनल्या आहेत.

गावापासून शहरापर्यंतच्या कवीच्या प्रवासाच्या खुणा जशा त्यांच्या कवितेत दृग्गोचर होतात तशाच तेथे वावरत असताना वाटचाला येणारी जटिल व विविध स्थित्यंतरेही काव्यरूप धारण करताना आढळतात. 'प्रश्न' कवितेची 'गद्यलय' (Prose Style) त्या कवितेला खोल आशय देऊन जाते.

'खुराड्यात जगणारे इथले असंख्य जीव
त्यांच्या किती तरी समस्या हृदयाला भिडणाऱ्या
अखेर एकच प्रश्न उभा ठाकतोय...
त्यांच्या सत्तेवरचा सूर्य केव्हा मावळणार ?'

लोकशाही समाज घटनेत 'त्यांच्या सत्तेची' सतत जाणीव होणे, येथेच कवितेची यशस्वी बंदिशी झाली आहे. 'ते जागे होत आहेत' या कवितेत अस्पृश्यतेचे ओझे आणि विषमतेचा निर्घृण शाप सोसणाऱ्या दलित समाजाच्या प्रदीर्घ मुक्ती संघर्षाचा समृद्ध स्वर त्यांनी पकडला आहे.

'मित्रास' ही या संग्रहातील एक विशेषाविशेष कविता. अनेकानेक सामान्यांचा, कलावंतांचा व असामान्यत्व देहकोशात वागवणारांचा हुंकार, श्री. आनंद मोरे यांनी शब्दांकित केला आहे.

'आम्ही सारे नतमस्तक होणारे...
विकलांग हातांनी तुला
सदैव शुभेच्छा देणारे...'

नेहमीच्या नेस्तनाबूत, परिस्थितीने जर्जर व गुलाम लोकांचा हा 'आतला आवाज' कवीने सामर्थ्याने मुखरित केला आहे. प्रत्येक राजकीय स्थित्यंतरात सामान्यांचीच आहुती पडते. ससेहोलपट होते. पण त्यांच्याही 'अस्मितेला' जपण्याची किंवा इज्जतीने वागवण्याची, ह्या मित्राला प्रार्थना केली आहे. अशा प्रार्थना अनाठायी असतात याची पूर्ण जाणीव कवीच्या काव्यपंक्तीतून प्रकट झाली आहे. कोणाचेही वा कुठलेही नाव न घेता.

'या देशाचा होशील प्रमुखही...
आणि असशील सत्तेवर...
तुझ्या गरुडझेपेला कोण रोखणार ?'

हा समस्तांचा ग्रस्त प्रश्न श्री. आनंद मोरे प्रत्ययकारक रीतीने मांडतात. कवितेचा समारोप तर फारच काव्यात्म व संसूचक आहे–

‘ आमची अखेरची एकच विनंती
फिरवू नयेस आमच्या अस्मितेवर
तुझ्या सत्तेचे आसुरी बुलडोझर...’

‘ प्रार्थना ’, ‘ भिक्षा ’,‘ प्रवास ’ आणि ‘ डंख ’ ह्या देखील या संग्रहातल्या चांगल्या कविता आहेत. कवीच्या मनोमनाचे अनेक स्वर, बहुरंगी ढंगाने या कवितांतून व्यक्त झाले आहेत. आग ओकणाऱ्या रस्त्यावर ठेचा खाण्याची सवय झालेला नित्याचा हा प्रवासक्रम एखादीच ‘ पहाट वाटचाला ’ आली तरी निरागस सर्वस्वागतशील स्मित जन्माला घालण्याची ह्या प्रवाशाची जिगर आहे. भावफुलांचा सडा वेचण्यासाठी लक्तरे घेऊन कसे जावे ? असे आत्मभान आहे. आपली वंचना झाली तर झाली, पण ज्या बेईमान राज-कुमाराने संपत्तीचे व प्रीतफुलांचे अंथरूण उभे केले त्याचे तरी निर्माल्य होऊ नये अशी ‘ प्रार्थना ’ समंजसपणे केली आहे.

रस्ते, त्यांचं जीवन, वेदना वगैरे काही फसलेल्या कविताही या संग्रहात आहेत. पल्लेदार विचारलय प्रकट करणाऱ्या वृत्तीचा हा कवी नाही. ‘ या नगरीत ’ ही अखेरची एकच कविता त्या दृष्टीने पाहता येईल. ती खूप बोलकी होते आणि कवितापण हरवून जाते. कारण श्री. मोरे यांची वृत्तीच भावकवीची आहे.

कवीच्या मनोवृत्तीवरील संमिश्र संस्कारांच्या छटा न्याहाळून पाहिल्या तर प्रामुख्याने जाणवते त्यांची एकाग्र भावात्मता. साधा सहज आविष्कृत होण्याचा मनस्वी पिंड व पीळ. आणि हीच श्री. आनंद मोरे यांच्या ‘ संदर्भ ’ संग्रहातील जमेची मोठी बाजू आहे. हा कवी आपल्या स्वाभाविक ऋजुतेचा भावरंगफलक घेऊन सामोरा येतो आहे. मला वाटते, रसिकाच्या अंतर्मनात हळुवारपणे त्याचे नाव झंकारत राहील.

**–केशव मेश्राम.**

२८ जून १९८४

# कवितेचा आस्वाद घेण्यापूर्वी....

मी एफ्. वाय्. बी. ए. ला असेन त्यावेळी. हिंदी विषयाच्या नोटस् तपासण्यासाठी एकदा माझी वही मी माझ्या गुरुवर्या– प्रा. रजनी भागवत यांना दिली होती. त्या वहीमध्ये त्यांना एक कागदाचं चिठोरं मिळालं. त्यावर मी एक कविता लिहिलीय असं बाईनी मला क्लासमध्ये सांगितलं. माझ्या दृष्टीनं ही काही नवीन गोष्ट नव्हती...... मला नेहमीच कडवा संघर्ष करावा लागलाय. आता नोकरी सांभाळून एम्. ए. करताना सुद्धा त्याची वारंवार प्रचिती येतेय. तरी सुद्धा... १४–१५ व्या वर्षापासून मी कविता लिहितोय. कविता केली की ती २–३ वेळा वाचायची आणि फाडून टाकायची. हे नित्याचंच...

' मोरे, तुम्ही नेहमी कविता करता का ?' बाईंनी विचारल्यावर मी त्यांना माझी खरी वस्तुस्थिती सांगितली. कविता लिहिल्यावर ती मला वाचून दाखवल्याशिवाय फाडून टाकायची नाही, असं बाईंनी त्या वेळी मला सुनवलं... आणि तेव्हापासूनच मी सातत्यानं कविता लिहित गेलो. त्यांचे संस्कार, प्रेरणा आणि योग्य ते मार्गदर्शन यामुळेच हा माझा पहिला काव्य-संग्रह प्रकाशित होत आहे.

सरांचं (प्रा. संभाजीराव जाधव) प्रोत्साहन आणि सहकार्य मी कधीच विसरू शकणार नाही. भागवत बाईंनी व जाधव सरांनी माझ्यावर जे उत्कट प्रेम आणि औदार्य दाखवलं ते शब्दात सांगणं कठीण...

माझ्या सर्व मित्र–मैत्रिणींच्या सहकार्याचा व प्रोत्साहनाचा मोठा वाटा माझ्या यशामध्ये आहे हे मला नमूद करणं अपरिहार्यच...

काही वर्षापूर्वी मी माझ्या एका साहित्यिक मित्राकडं गप्पा मारण्यासाठी गेलो होतो. त्या वेळी मी त्याला सहज म्हणालो होतो, ' मी माझ्या कविता

एखाद्या प्रकाशकाकडं पाठवू का ?' तेव्हा तो म्हणाला होता– 'आनंद, तू कविता लिहिण्यापेक्षा कथा सुंदर लिहितोस. काव्यसंग्रहाच्या फंदात कशाला पडतोस ?' त्या वेळी मी त्याला काहीच बोललो नाही. कारण मी जितका माझ्या कथेशी प्रामाणिक आहे तितकाच कवितेशी... योगायोगानं माझा काव्यसंग्रह प्रथम प्रकाशित होतोय.

ठिक–ठिकाणच्या स्पर्धांना पाठवून माझ्या कॉलेजनं (छत्रपती शहाजी महाविद्यालय, कोल्हापूर) मला उपकृत केलंय. आकाशवाणी पुणे आणि मुंबई केंद्रानं मला 'कथा–कथन व काव्य वाचनाची' वारंवार संधी देऊन माझ्या कलेला वाव दिलाय.

तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने मला अनुदान देवून माझ्या यशाचे दरवाजे खुले केले आहेत. मा. वा. वि. भटांचे आभार मानावे तितके थोडेच. त्यांनी माझी महत्वाची बाजू उचललीय. वर नमूद केलेल्या (कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांसह) सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

प्रा. मेश्राम सरांनी माझ्या काव्यसंग्रहाला प्रस्तावना दिलीय याचा मला सार्थ अभिमान आहे. त्यांचा मी सदैव ऋणी आहेच...

...अर्थात् माझं यशापयश हे सूज्ञ वाचकांवर अवलंबून...

–आनंद मोरे

२८ जून १९८४.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# डाव

त्यांना मी टाळण्यासाठी
शेजारच्या घरांत गेलो. .
तेव्हा ते माझीच
वाट पहात होते...
त्यांचे राजकीय डाव
मला गिळंकृत करणारे....!

एक

# बरं केलंस

वाळूचा किल्ला बांधता-बांधता
मी मशगूल
केवळ तुझ्याच मोहांत गुरफटून !
माझा हात हातात घेऊन
तू हळुवार म्हणालीस
समुद्रपक्षाचं घर कुठं असतं रे ?
बरं केलंस
विसरलो होतो मी सुद्धा
इथल्या करोडो जीवांच्या
उध्वस्त संसारांची दाहकता ! !

●●

दोन

# एकाकीपण

तो वृक्ष
अजूनही तसाच ताठ उभा
साहिल्यात त्यानं
ग्रीष्मातल्या झळा !
आणि अनुभवलेत
उन्ह- पावसाचे लपंडाव !
पाहिलेत सुद्धा
उन्मळून पडणारे महामानव !
अर्थ-निरर्थ यांचे संदर्भ साधताना
प्रकर्षानं जाणवतंय एकाकीपण ! !

● ●

तीन

## मानवता

हातावर गोंदलेला–
येशूचा ' क्रॉस ' पाहून
तुझ्यातल्या मानवतेची–
हांक ऐकू येते !
अनवाणी पावलांची–
तुझी भ्रमंती स्मरून
इथल्या दारिद्र्याची–
वारंवार प्रचीती येते ! !

• •

## किनारे

आपणच बांधीत असतोय
आपल्या जीवनाचा मनोरा
काळाची गती अजमावताना
होतोय मनाचा कोंडमारा
सुखदु:खांच्या अनुभवांना
असतेय वेदनेची झालर
तरीही लिपिबद्ध करतोय
अक्षर अन् अक्षर
रात्र भिजते आसवांत
विरतात उसासे सारे
गवसतो सहारा तरीही
फसवे सारे किनारे.

• •

चार

# भावना

तू
निघून गेलीस
कधीही न परतण्यासाठी
काळ
कुणासाठी थांबत नसतो
हे सारं माहित असूनही
मी आज कळत-न कळत पानं चाळली
तू दिलेल्या
तुझ्या डायरीतील अक्षरं
बनली होती मोर–पिसं
केवळ तुझीच साक्ष देण्यासाठी
आता
मी माझ्या भावना कलम केल्यायत
इथल्या बलात्कारित जनतेला सावरण्यासाठी

●●

पाच

## देहान्त

मध्य रात्र
सजवता- सजवता
करीत असतेय
जगण्याचा आकांत
उत्तर-रात्रीच्या
मुक्ती नंतर
पाहतेय ती
तिचाच देहान्त

••

## प्रतीक्षा

दिवेलागण झाल्यावर
आसमंत होतोय
धूसर- धूसर अन्
रातकिडयांची किरकिर
थाप पडतेय
तिच्या दारावर
हृदयात कंप
ओठांची थर-थर
रात्र छेदतेय
तिची नजर
प्रतीक्षा करून
ती गेल्यावर.

••

सहा

## अशा अवेळी

विदीर्ण सारे अवखळ वारा
हांकेपासून दूर किनारा
छातीवरचा पदर बावरा
मुखड्यावरती भाव लाजरा
प्रीत–कळा अन् कातरवेळा
जिथे नसावे कोणी
अशा अवेळी आत्म्यासंगे
गावित गाणी कोणी

●●

## ती उभी

पानांची सळसळ
पक्षांची फडफड
वेळूच्या बनांत
विरून जातंय
चंद्राचं प्रतिबिंब
खळखळणाऱ्या पाण्यात
फुलांचा गंध
श्वासांत घेऊन
ती उभी
केव्हाची अंगणात

●●

सात

# सद्भावना

गर्द–निळ्या आभाळाच्या डोहात
संधि-प्रकाशाची किरणं बुडून जातात
पक्षांच्या रांगा अदृश्य होतात
आणि क्षितिज– रेषाही पुसून जातात
या गजबजलेल्या शहरातील चांदण्या
मृतवत् देवांना वासनेनं सजवतात
कुबटलेल्या त्यांच्या खिडक्यांच्या झरोक्यातून
लाल दिव्यांचे प्रकाश -झोत
क्षणभर बाहेर येतात आणि
क्षणात विझतात, का विझतात ?
आयुष्यभर भोगलेल्या माझ्या भोगांना
मग अंकुर फुटतात
आणि अखेर माझ्यातल्या सद्भावना
मंत्र म्हणू लागतात !

● ●

आठ

# वास्तव

तू हसतांना
तुझ्या गालावरची
खळी पाहून
क्षणभर मोहरतोय
शरीरातला कणन्-कण
कधी–कधी शहारतोय
इथल्या व्यवहाराचं
वास्तव जाणवून.

••

नऊ

# नाती

कडाडती विजा का
नभ काळे बरसती ?
क्षितिज अन् आकाश
सांगती अनामिक नाती !
होता आघात अंतरी
आसवे का गर्दी करती ?
नसतो कुणीही कुणाचा
माझे– माझे सारे म्हणती !

••

दहा

# जखमा

शरिरावरचे पाहून
फाटके वस्त्र
वेधतात नजरा
बुभुक्षित सहस्र
माझं मलाच
उमजून चुकतंय
नुसताच तो
भास असतोय
उगीचच नकली
स्मित करून
शरिरावरच्या जखमा
घेतोय शिवून.

●●

अकरा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

## एक मुसाफिर

प्रसन्न वदन
कमनीय शरीर
बांगड्यांची किणकिण
हास्याची लकेर
कुरळे केस
रुळतात मानेवरून
नसतेय तिला
कशाची फिकीर
जोगवा मागत
तिच्या दारावरून
नेहमीच जातोय
एक मुसाफिर.

••

बारा

## फकीर

जीवनाच्या या कोलाहलात
प्रेत स्वतःचे स्वतःच पुरतो
कोण असतो असा सुदैवी
चंदनशय्येवर निद्रा घेतो
सूर्य ढळतो माणुसकीचा
आयुष्याच्या क्षितिजावरून
एक मुसाफिर झोपी जातो
आकाशाची शाल पांघरून
नयनामधले खारट पाणी
कोण जगतो प्राशन करून
कोण अभागी फकीर जगतो
पानांमधले अन्न चोरून.

तेरा

# मित्रास

तू पुढे
पुढेच चाललास
थांबणं तुला माहितच नाहीय !
आहेस आता तू यशाच्या शिखरावर
कदाचित्
या देशाचा होशील प्रमुखही
आणि असशील सत्तेवर !
तुझ्या गरुडझेपेला कोण रोकणार ?
असामान्य कर्तृत्वाला तुझ्या
आम्ही सारे नतमस्तक होणारे !
विकलांग हातांनी तुला
सदैव शुभेच्छा देणारे
तू सिकंदर व्हावंस
हीच प्रार्थना !
आम्ही नेहमीचेच नेस्तनाबूत
परिस्थितीचे गुलाम आणि जर्जर !!
आमची अखेरची एकच विनंती
फिरवू नयेस आमच्या अस्मितेवर
तुझ्या सत्तेचे आसुरी बुलडोझर !!

●●

चवदा

# त्यांची मैफल

त्यांच्या मैफलीला
वेदनांचे गीत
सुखाचा आवेग
...... कधी तरी
त्यांच्या मैफलीला
अंधाराचा साज
चांदण्याचा वेध
...... कधी तरी
त्यांच्या मैफलीला
आसवांचा पूर
हास्याचा झंकार
...... कधी तरी.

●●

पंधरा

# भिक्षा

शतदल पाकळ्यांनी
हृदय–कोष विणलेला
नसा–नसांतून तुझ्या
भक्तीचा ओलावा मंतरलेला
गाभाऱ्यात आहे
भाव–फुलांचा सडा
येऊ कसा तुझ्याकडे
उरले लक्तर
माझे आता
मागू भिक्षा कुणाकडे.

●●

सोळा

# अभागी

सूर्य ढळून गेल्यावर
डोळे तिचे वाटेवर
अंधार छेदून आर-पार
त्याला शोधणारी तिची नजर
तो तर उभा क्षितिजा-पार
सोबत घेऊन नक्षत्रांचा हार
काजव्यांचा प्रकाश अन्
काजव्यांचाच आधार
अशी अभागी ती
कधी पोहचणार !

●●

सतरा

# नागवे

शरिरांवरील जातींच्या अनंत जखमान्वर
आभाळाच्या तुकड्यांची ठिगळं जोडतांना
ते रक्ताच्याच धारांचा धागा बनवतात !
कधी–कधी मग आभाळच बे–इमान बनून
जखमान्वरील टाक्यांना उसवून टाकतं
तेव्हा त्यांच्या सर्व वेदनाच मरून जातात !
एखादा व्रण खुपू नये म्हणून
स्वत:ला सावरता–सावरता
ते कायमचेच नागवे बनून जगत असतात !
... ते कायमचेच नागवे असतात !

●●

अठरा

# दिशाहीन

खवळलेला समुद्र–
केव्हाचाच निपचित पडलाय
नुकताच कुठं–
कोकिळेला कंठ फुटलाय
वसंतातल्या नव्या पालवीला–
मोहोरानं साज आणलाय
करपलेल्या जीवनाला त्यानं–
निशिगंधाचा लेप दिलाय
निखळलेले दुवे सांधताना मात्र–
त्याचा कंठ दाटून आलाय
आणि आत्म्याचा शोध घेताना
तो आता दिशाहीन बनलाय !

●●

एकोणीस

# हास्यवदना

नवलाईचा शृंगार करून
ती उभी दारावर
रस्त्यावरच्या कळकट नजरा
वेधतात तिच्या अंगांगावर
माथ्यावर ओझे साहवतेय ती
मार्गातील कांटेरी अनुभवांचे
शृंखला तोडून ऋण फेडतेय
बेबंद इथल्या जगाचे
ती तर साक्षात्
मोनालीसा—हास्यवदना
लाजवतेय कधी-कधी
निळ्या नभांतील नक्षत्रांना !

●●

वीस

# तडजोड

शरीराच्या चिंध्या-चिंध्या होताहेत-
हृदयातून एकसारखं रक्त ठिबकतंय
तरीही मीं माणसं मिळविण्यासाठी वणवण भटकतोय
शरीरातला कणन्-कण झिजवून
कुठं-कुठं तरी ओलावा मिळतोय
क्षणभर जखम बरी झाल्याचा भास होतोय
अखेर भासच तो
कालांतरानं माझ्याच हृदयाचे लचके घेतात
ओलावा देणारीच माणसं !
तरीही मी
भग्न स्मृतींना कवटाळीत राहतोय
पर्वणी म्हणून अनिमिष आनंदानं !
कधी-कधी मी स्वत:वरच जळतोय
या निसर्गानं मला कठोर का बनवलं नाहीं ?
तर कधी-कधी असं वाटतंय
मनाची सारी कवाडं कायमची बंद करावीत
आणि एकटंच रहावं !
अखेर जीवन
एक तडजोड !!

●●

एकवीस

# तीही जगतेय

चौकांतल्या अशोकाच्या गर्द झाडाखाली
दररोजच बसलेली असतेय ती ओठंगून
भजी आणि पावाचे तुकडे
नाजूक बोटांनी चिवडत असतेय समोर ठेवून
नकळत गढूळ नजरेचा वेध घेतेय
मधूनच एखादा कटाक्ष टाकून
एखाद्याच सावजाला जखडून ठेवतेय
मंद-मंदसं स्मित करून
रोजच भूक भागवत असतेय ती
स्वतःच्याच शरिराचा लिलाव मांडून.
घनांध अंधाराचीच सोबती ती
झोपीही जातेय अंधारच पांघरून
स्वतःचंच प्रेत उशाशी घेऊन
उद्याच्या पुनर्जन्माला जागायचं असतं म्हणून !

• •

बावीस

# सत्य

तुफान अचानक उठले
राहिला दूर किनारा
लाटांचे पर्वत
वाहे बेबंद वादळी वारा
आले अंधारून सारे
आणि सूर्यही बुडाला
दूर क्षितिजावरचा तारा
तोही आता निमाला
प्रियेस हांक देतो
गाऊन प्रार्थना कोणी.
आत्म्यांत सत्य शोधताना
गोठून जाते वाणी.

••

तेवीस

## इषारे

मिटले आवर्त सारे
थिजले वाहते वारे
मुक्तीचे दीपही विझले
आले अंधारून सारे
भासले असे जरीही
ध्यानी असू द्या इषारे
जन्मताहेत इथेही आता
अंगार ओकणारे सूर्य–तारे.

• •

चोवीस

# डंख

मी सुद्धा इथं येताना
एकाकीच आलो होतो
अठरा–विश्वे दारिद्र्याला
साथ देण्यासाठी....
जाताना मात्र
ठेवून जाईन
आयुष्यभर भोगलेल्या
भोगांच्या पाऊलखुणा
आणि तुम्हालाही
माझ्याच पाऊलखुणांवरून...
यावं लागेल.
विषमतेच्या डंखांना
हृदयांशी कवटाळून....

● ●

पंचवीस

## त्यांचं जीवन

आले क्षण
गेले क्षण
गेलंय मन
केव्हाचंच मरून
संगतीला त्यांच्या
अश्रूंचं उधाण
यातनांचा सण
त्यांचं जीवन.

● ●

सव्वीस

# तिची कर्मकहाणी

वासनेचे सूर्य पोटात पचवून
सारीच वाट तुडवतेय ती अनवाणी.
एखादाच कर्ण भेटेल म्हणून
साऱ्यांनाच सांगितली तिने स्वतःची कर्मकहाणी.
उरोजावर खिळलेल्या नजरा पाहून
सावरली अब्रू तिच्याच अश्रूंच्या लक्तरांनी.
प्रेतांशी तिच्या संभोग घेऊन
भागवलीय भूक इथल्या साऱ्याच दानशूरांनी.
साऱ्याच आयुष्याची होळी करून
शरीर सजवतेय ती वेदनेच्या अंगारांनी.
माध्यान्हीच्या झळा उराशी घेवून
आजही गातेय ती पुनवेची गाणी.

● ●

सत्तावीस

# ते जागे होत आहेत

आम्हीच आमच्या स्वार्थासाठी त्यांना
वेशीबाहेर टाकून दिलं
अस्पृश्यतेचं ओझं
त्यांच्या माथीं मारलं.
हजारो पिढ्या उध्वस्त केल्यायत
नेस्तनाबूद स्त्रियांची इज्जत लुटून
भूक भागवलीय आमच्या डोळ्यांनी.
आता त्यांनी...
अज्ञानाचे जोखड फेकून दिलेत
क्षणा-क्षणाला ते
मुक्तीचे दरवाजे ठोठावताहेत
त्यांच्या नसा-नसांतून आता
क्रांतीचे सूर्य पेटून उठताहेत.

●●

अठ्ठावीस

# रस्ते

पुसून जाती कधी अचानक वाळूवरच्या रेषा
चंद्र खुलवितो कधी अचानक रात्रीच्याहीं आशा
गीत गातो कुणी अनामिक सप्त–सुरांच्या सजावटीने
सूर हरवता कधी अचानक सारेच भासे विराणे.
सूर्यास्ताच्या प्रतिबिंबासम कधी कुणाचे जगणे
क्षितिजाच्याही प्राप्तीसाठी नुसतेच कसे हे तगणे
गगन भेदण्या गरूड घेतो उंच भरारी जरी
अखेर सारे रस्ते मिळती मृत्यूच्या या दारी !

●●

एकोणतीस

# आस्तित्व

माझ्या कोऱ्या करकरीत
स्मृती–पटलावर
एक चित्र कोरलेलं
मीच रंग बनून
मनाच्या कुंचल्यानं
सप्तरंगात रंगवलेलं
जीवनाच्या या
जीवघेण्या फेऱ्यांतून जाताना
माझं आता
अस्तित्वच नाहीसं झालंय.

••

तीस

# ते

घणाघाती घाव
घालीत असतात ते
अविरतपणे...
कभिन्न काळ्या खडकांवर
उमटतात त्यांच्या
श्रमांच्या अनंत खुणा
क्षितिजापलीकडील
हुंकारावर...
ठिबकायला लागतात
रक्ताचे थेंब
घामेजलेल्या शरीरांतून...
वेदनांचे डोंब
उफाळतात मग
पिळवटलेल्या आतड्यांतून...
स्वतःचं जीवन
उध्वस्त करून
सजवतात ते
'त्यांचे' बंगले
स्वतःच्याच रक्ताच्या
थेंबा-थेंबातून.

● ●

एकतीस

## अर्थ

मागितलीस भिक्षा तू
तुझी ओंजळ पसरून
सावरलं नव्हतं मी स्वतःला
माझ्या यशाच्या धुंदीतून.
राहिलीस अखेर तू
तुझ्या संकल्पांना अडून
माझ्यातल्या अहंकाराने
परत पाठवलं तुला झिडकारून.
गेलीस मात्र
माझ्या मनात काहूर पेटवून
आजही शोधतोय मी तुला
तुझ्या शब्दांच्या अर्थामधून.

••

बत्तीस

## क्षण

रखरखीत माध्यान्ह
सरलेली केव्हाचीच
लोपणाऱ्या संधिप्रकाशाचा
किरण एखादाच
किरण पांघरून
उद्विग्न मन
असाही क्षण
सारेच उदासीन.

●●

तेहतीस

## वेदना

तुझ्या डोळ्यांतून
ओघळणारे अश्रू
माझ्या ओंजळीत
झेलण्यासाठी झेपावलो
तेव्हा समजलं
माझे हात
कलम केलेत
असह्य वेदनांनी

●●

चौतीस

# प्रवास

तोच तो
नित्याचाच प्रवास असतोय
तरीही मी
हरवलेल्या नक्षत्रांना–
ओंजळीमध्ये शोधण्याचा
प्रयत्न करतोय.
अडथळे अनंत
तेही आता
बोथट बनलेत
पायांना मात्र
ठेंचा खाण्याची नित्याचीच सवय.
कधी तरी
एखादीच पहाट
सुखावणारी
क्षणात विरणारी.
नुसतेच
आग ओकणारे रस्ते
पहावे लागतात
रक्ताचेच अश्रू -
सताड डोळे उघडे ठेवून
न कळत
स्वतःचं अस्तित्व जाणवून–
मन अडखळतंय
एखादंच स्मित निर्मावं म्हणून. ●●

पस्तीस

# संघर्ष

त्यांचा काफिला
केव्हाच निघून गेलाय.
तुझ्या मानेवर
लाचारीचे जोखड ठेवून
पायात तुझ्या
गुलामगिरीच्या बेडया ठोकून
तू अश्वत्थामा.
तरीही भेदणार नाहीस
इथल्या समाजव्यवस्थेचा चक्रव्यूह...!
तू क्रांतिकारक.
तरीही नाहीस
हसत-हसत फासावर जाणारा भगतसिंग ..
किंवा छातीवर गोळ्या झेलून
अजरामर होणारा मार्टिन ल्यूथर किंग...
तू मरणासन्न.
तरी देखील तुला
बेंबीच्या देठातून टाहो फोडायचाय
त्यांच्या सत्तेचं आसन उलथून टाकण्यासाठी.

• •

छत्तीस

## प्रार्थना

सारी सफरच करीत होतो मी
घनांध वाटेवरून
कळलं नव्हतं कधीही
मी तर चाललोय
आकाशातल्या सूर्याला पोटात पचवून...
हेही तितकंच खरं
उमजलं नव्हतं त्या वेळी
माध्यान्ह आणि पहाटेमधले संदर्भ
तरीही ते मला सदोदित करायचे सलाम
आणि हे सर्व समजूनही
माझे हात मात्र बनले होते गुलाम
मोहक भासणाऱ्या तुझ्या रूपाला
आलिंगन देण्यासाठी
आता मी
फकीर बनलोय...
तुटलेल्या पतंगाप्रमाणं
फरफटत चाललोय
तू तुझ्या सर्वस्वाचं योगदान दिलंयस
संपत्तीनं सजलेल्या
एका बे–इमान राजकुमाराला
ज्यानं आज तुझ्या पायांशी
प्रीत–फुलांचं अंथरूण पांघरलंय
त्यांचं निर्माल्य होवू नये
हीच माझी अखेरची प्रार्थना.

●●

सदतीस

# या नगरीत

अजून किती भोग भोगायचेत
माझं मलाच कळत नाही.
मनाच्या एका कोंदणात
सूर्याला लपवू पाहतोय.
किरणं काही–
आग ओकायची थांबत नाहीत
चांदण्यांचं चांदणं कधी–कधी
मनाला भुरळ पाडतंय
पण–
अमावास्येच्या रात्री
नग्न नगरीची नाचक्की पाहून
पौर्णिमेचा चंद्र सुद्धा
नसा–नसातून आग भडकावतोय.
काळवंडलेलं काळं आभाळ इथं–
अश्रूंच्या धाराच काय ते बरसतंय.
भकास झालेल्या माझ्या डोळयांतून–
अश्रूच काय
खारट पाणी सुद्धा टपकायचं
केव्हाचंच बंद झालंय...

कानठळ्या बसवणाऱ्या इथल्या
कर्कश आवाजांच्या सरावाने
बासरीचे बोल सुद्धा इथे
बदसूर वाटतात...
कुहुऽऽकुहु कूजन करणाऱ्या कोकिळांनी
स्वतःच्याच कंठांचा केव्हाच
इथं लिलाव केलाय...
सांज सूर मात्र
नित्य नियमानं ऐकू येतात
भग्न वीणेची नुसतीच
याद करून विरून जातात.
घुत्कारणारी इथली घुबडं
दिवसा देखील घुत्कारतात.
कोमल कळयांच्या मृत्यूच्या संदेशाची–
जणू ती चाहूलच देतात.
सुस्तावलेल्या इथल्या साऱ्यांच्या जिव्हा
जेव्हा वटवट करू लागतात
माझेच सोज्वळ शब्द तेव्हा–
माझ्यापासून दूर जातात...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
शाखा (स्थळ प्रत)

माझा जीर्ण झालेला शर्ट
मला उगीचच म्हणतोय
माझ्या चिंध्या–चिंध्या झाल्या तर
तू का उघडाच रहाणार आहेस ?
दारिद्र्यानं पिचलेल्या
या दीन–दलित नगरीत
मस्त झालेल्या कुत्र्यांना–
मला सावरताच येत नाही.
त्यांनीच माझ्या काळजाचे
लचके घेतलेत.
भळभळा वाहणाऱ्या रक्ताचे ते
आस्वाद घेऊ पाहताहेत.
क्षणा-क्षणाला शरीराचा तोल जातोय
पण...
माझे हातच मला सावरत असतात–
फाटलेल्या काळजावरचे
जणू ते टाकेच असतात...
रक्तावर जगणाऱ्या इथल्या जळू
जाळल्या तरी जळत नाहीत.

संपत्तीच्या जोरावर नाचणारे इथले नराधम
आग रिचवायलासुद्धा सरावलेत
विचकटलेले इथले चेहरे–
जेव्हा स्मित करतात
सुस्तावलेले ओठ त्यांचे
नुसतेच थरारत असतात
दिवसा–ढवळचा देखील
विक्रय इथं होत असतो.
वाटेवरचा माथेफिरू सुध्दा
कटाक्ष टाकून सुखावत असतो.
भुकेला बळी पडणाऱ्या इथल्या जीवांना–
भूकच निर्लज्ज बनवते
मत्त झालेल्या महामानवांना
तृप्त इथंच केलं जातं
तृप्प इथंच केलं जातं.

••

अडतीस

## माझं भिकारपण

ते म्हणाले–
तुझी भूक
भागवणार नाहीत... तुझ्या कविता
तेव्हा मी
त्यांच्याकडं पाहून
नुसतंच हसलो.
माझ्या कवितेचा
कटोरा घेवून
भिक्षा मागण्यासाठी
वणवण भटकतोय
त्यांच्या दारावरून
ते आता
खदखदून हसताहेत
माझ्या भिकारपणाला !

●●

एकोणचाळीस

## भेसूर

वृक्षांची पानं
गळून पडतात
फुलांचे संदर्भ
पुसून निघतात
पक्षांचे थवे
उडून जातात
गीतांचे स्वर
भेसूर वाटतात...

●●

चाळीस

## पाऊस

पावसाचे थेंब
अविरत पडतात
टप्–टप्–टप्–टप्
छपरावरून आणि पानावरून
एक पारवा
अंग सुकवतोय
पंख फडफडवून
पाऊस मात्र ओला चित्र
आतून आणि बाहेरून

●●

एकेचाळीस

## प्रश्न

प्रत्येक भिंतीला असतो दरवाजा
असं म्हणणारे-
खुशाल म्हणू देत
मी मात्र नेहमीच पाहतोय
इथल्या वास्तवाचा आलेख
दिवसे-दिवस वाढत जाणारा
दोन घास अन्नासाठी-
पोरीला विकणारा बाप
आणि इज्जतीच्या रक्षणासाठी
आक्रोश करणाऱ्या हजारो अबला…!
खुराड्यात जगणारे इथले
असंख्य जीव
त्यांच्या किती तरी समस्या
हृदयाला भिडणाऱ्या !
अखेर एकच प्रश्न
नेहमीच सतावतोय
त्यांच्या सत्तेवरचा सूर्य
केव्हा मावळणार !

● ●

## महत्त्वाची दुरुस्ती

| | | |
|---|---|---|
| पृष्ठ १९ | शेवटची ओळ | ती गेल्यावर ऐवजी तो गेल्यावर |
| ,, २१ | सहावी ओळ | देवांना ऐवजी देहांना |
| ,, ४५ | सहावी ओळ | संकलपांना ऐवजी संकलपांशी |
| ,, ५२ | अकरावी ओळ | रक्ताचे ऐवजी रक्ताचा |

मराठी ग्रं संग्रहालय ठाणे
दा. क.
मुंबई शाखा (स्थळ
REFBK-0024444
REFBK-0024444